स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण

## (इ.स. १८१८ ते १९६०)




संपादक

डॉ. धर्मराज शिवाजी पवार

डॉ. मल्हारी गुरूनाथ शिंदे

डॉ. बालासाहेब बाबुराव टेकाळे



एज्युकेशनल

पब्लिशर्स अ‍ॅण्ड डिस्ट्रिब्युटर्स

# आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण

## (इ.स. १८१८ ते १९६०)

✿ संपादक ✿

**डॉ. धर्मराज शिवाजी पवार**

सहाय्यक प्राध्यापक (इतिहास)

जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालय,

लोहारा, जिल्हा- धाराशिव

**डॉ. मल्हारी गुरूनाथ शिंदे**

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र)

छत्रपती शिवाजी महाविद्यालय,

कळंब, जिल्हा- धाराशिव.

**डॉ. बालासाहेब बाबुराव टेकाळे**

सहाय्यक प्राध्यापक (इतिहास)

शिवछत्रपती महाविद्यालय,

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

एज्युकेशनल पब्लिशर्स

# * आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण
## (इ.स. १८१८ ते १९६०)

©

✿ संपादक ✿

डॉ. धर्मराज शिवाजी पवार

डॉ. मल्हारी गुरूनाथ शिंदे

डॉ. बालासाहेब बाबुराव टेकाळे

* ISBN No. : 978-93-92865-77-0

* प्रकाशक

एज्युकेशनल पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रिब्युटर्स,
पो.बॉ. नं. १३१, गोकुळवाडी, औरंगपुरा,
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१.
दूरध्वनी क्रमांक : ०२४० - २३२९२०४
भ्रमणध्वनी क्रमांक : ९४२१३०००३६, ९९७००६७९७१
ई-मेल - educationalpub@gmail.com
वेबसाईट - www.educationaldp.com

* मुद्रणस्थळ :

महारुद्र ऑफसेट,
छत्रपती संभाजीनगर

* प्रथम आवृत्ती : ९/०६/२०२३

* किंमत - ३५०/-

# अनुक्रमणिका


| | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | राजर्षी शाहू महाराज आणि शिक्षण<br>*डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार* | १ |
| २. | बडोद्यात गायकवाडांची सत्ता<br>*बाबा भांड* | १९ |
| ३. | आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणी मध्ये श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान – इंजि. नेताजी गोरे | ३३ |
| ४. | महात्मा जोतीराव फुले यांचे स्वातंत्र्यविषयक विचार<br>*डॉ. शिंदे आर. डी.* | ५२ |
| ५. | एकोणिसाव्या शतकाच्या आरंभकालीन महाराष्ट्रातील लोकनेतृत्व – बाळशास्त्री जांभेकर - *डॉ. भावना पाटोळे* | ६३ |
| ६. | संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि भाई उद्धवराव पाटील<br>*प्रा. डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख* | ७९ |
| ७. | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक विचार<br>*प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे* | ८८ |
| ८. | आधुनिक महाराष्ट्राची 'अक्षय उर्जा' : महाराजा सयाजीराव गायकवाड - *देवदत्त कदम, वारणानगर* | ९५ |
| ९. | महात्मा फुलेंचे साहित्य आणि समाजसुधारणा चळवळ : चिकीत्सक अभ्यास - *प्रा. सपकाळ रामेश्वर विक्रम* | १३२ |
| १०. | महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतीय राष्ट्रवाद<br>*प्रा. डॉ. धीरजकुमार नजान* | १३८ |
| ११. | विठ्ठल रामजी शिंदे: अस्पृश्यता उत्थानाचे मसीहा!<br>*डॉ. मल्हारी गुरुनाथ शिंदे* | १४४ |
| १२. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील जीवन आणि शिक्षण विषयक मुल्ये: वर्तमान काळाच्या संदर्भात<br>*प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे* | १५४ |
| १३. | सद्यःस्थितीत गांधीजींच्या विचारांची आवश्यकता<br>*डॉ. नंदकिशोर नानासाहेब उगले* | १५८ |

# संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि भाई उद्धवराव पाटील

**प्रा. डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख**
शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, कन्नड
ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

भाई उद्धवराव पाटील हे बहुजन समाजातून नव्याने उदयाला आलेले नेतृत्व. मुळातच प्रसिद्धी परांङ्मुख. त्यातच शहरातील पत्रकारांनी दर्लक्षित केल्यामुळे वर्तमानपत्रात कधी गाजावाजा नाही. त्यामुळे त्यांचं मोठेपण कळायला उशीर झालेला. सुरुवातीला त्यांनी धाराशिवचे (उस्मानाबादचे) नेते म्हणून त्यांची बोळवण केली जायची. पण कालांतराने मराठवाड्याचे नेते असल्याची मान्यता त्यांना द्यावी लागली. पण खऱ्या अथाने उद्धवरावांचं मोठेपण हे असं मर्यादित नव्हतं. त्यांची झेप मानवतेला गवसणी घालाणारी होती. केशवसुतांच्या 'शुर शिपाई'चे ते प्रतिनिधी होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी हे नेतृत्व महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने परिचित झालं.

भाई उद्धवरावांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्वातंत्र्य सैनिक म्हणून काम कलेलं. जमिनदारी, सावकारशाही नेस्तनाबूत करण्याच्या चळवळी केलेल्या. शेतकरी कामगार पक्षाच्या संस्थापक सदस्यापैकी ध्येयवादाने झपाटलेले एक आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जेव्हा क्षीण स्वरूपात होती, त्यावेळी हैद्राबाद विधानसभेत आमदार असताना मराठवाडा हा संयुक्त महाराष्ट्रात बिनशर्त सामील करण्याचे त्यांनी यत्न केलेले. अशा पार्श्वभूमीवर बहरलेल्या उद्धवराव पाटलांच्या नेतृत्वाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीत उडी घेतली नसती तर नवल! संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांच्या नेतृत्व गुणाचा खरा कस लागला. महाराष्ट्रातील आणि प्रामुख्याने मराठवाड्यातील शेतकरी, शेतमजूर, दलित आणि स्त्रियांना चळवळीत आणणाऱ्या भाई उद्धवराव पाटील यांचे योगदान कुणी विसरूच शकत नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शहरी भाग कॉ. डांगे, आचार्य अत्रे आणि श्री. एस. एम. जोशी यांनी सांभाळला तर ग्रामीण भाग चळवळीत सामील करण्याचे काम या उद्धवराव पाटील आणि क्रांतीसिंह नाना पाटलांनी केले म्हणून चळवळीला मोठे क्रांतीकारक रूप आले. ते स्वरूप समजून घेण्यासाठी

ISBN-978-93-92865-77-0

ली तर संयुक्त महाराष्ट्र समितीची प्रचार मोहिम अत्यंत आक्रमक स्वरूपाची होती. या निवडणूकीत विधानसभेच्या 264 जागा पैकी समितीने 129 आणि लोकसभेच्या 44 पैकी 23 जागा जिकल्या. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मुंबई शहरात कँग्रेसचं पानिपत झाल. काँग्रेसचे अनेक जेष्ठ नेते पराभूत झाले. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेसला पराभूत केले. लोकक्षोभाचे चटके काँग्रेसला अनुभवायला मिळाले पण गुजराथमधील काँग्रेसच्या आमदारांच्या संख्येमुळे काँग्रेसला निसटते बहुमत मिळाले. पुन्हा नामदार यशवंतरावजी मुख्यमंत्री झाले.

नामदार यशवंतराव चव्हाण हे चतुर राजकारणी. त्यांनी प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ शिवपुतळा बसविला. त्याचे अनावरण करण्यासाठी पंतप्रधान पंडित नेहरुंना आमंत्रित केले. पुतळा अनावरणाचा कार्यक्रम दि. 30 नोव्हेंबर, 1957 रोजी व्हायचा होता. तेव्हा समितीमध्ये मतभेद असतानाही एस. एम. जोशीनी नेहरुपुढे शांततापूर्ण निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्यात भाई उद्धवरावांचा आग्रह आणि सहभाग मोठा होता. शिवपुतळ्याचे अनावरण करण्याचा दिवस उगवला. भाई उद्धवरावांनी ग्रामीण भागातील लोकांचे लोंढेच्या लोंढे खेचून आणले. शिवपुतळ्याचे अनावरण करण्यास नेहरु येत असताना त्यांच्या मार्गावर मराठी भाषिक जनतेने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शिस्तीत उभे राहून प्रचंड निदर्शने केली. वाईपासून पसरणीच्या घाटापर्यंत जाईपर्यंत 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' या निदर्शकांच्या घोषणा नेहरुंच्या कानावर आदळत होत्या. त्या काळात भाई उद्धवराव पाटील हे विधानसभेत एस. एम. जोशीनंतर विरोधी पक्ष नेते होते. विधानसभेतही त्यांनी आपल्या घणाघाती, तर्कशुद्ध भाषाणांनी सत्ताधारी काँग्रेस पक्षाची सळो की पळो अशी स्थिती करून सोडली. आणि अनेकवेळी मुख्यमंत्र्यांची बोलती बंद केली. एवढेच नाही तर उद्धवरावदादांनी यशवंतरावजींच्या नेहरु भक्तीसही आव्हान दिले होते. व्यक्तीपेक्षा महाराष्ट्र मोठा, हेच त्यातून त्यांना सुचवायचे होते.

प्रतापगडावरील अश्वारूढ शिवपुतळ्याचे अनावरण केल्यानंतर नेहरूंना महाराष्ट्रातील लोकक्षोभाची खरी जाण आली. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष वाचविण्यासाठी अखेर नेहरुनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आणि गुजराथ राज्याच्या निर्मितीस मान्यता दिली. आणि 01 मे, 1960 रोजी या नव्या राज्याचे उद्घाटन करून लोकशाहीत लोकेच्छेचं महत्त्व



ISBN-978-93-92865-77-0

महाराष्ट्राच्या प्रश्नाची न्याय्य बाजू भाई उद्धवरावांनी आपल्या अस्खलित उर्दू भाषेतून प्रभावीपणे मांडली. त्याला बिगरमराठी श्रोत्यांनी वारंवार दाद दिली. भाई उद्धवराव हे मराठी भाषेतील प्रभावी वक्ते पण उर्दूतही तितक्याच प्रभावीपणे ते बोलतात हे सर्वांना प्रथमच जाणविले. दुसऱ्या दिवशीच्या दिल्लीतील वर्तमानपत्रात भाई उद्धवरावजीचे भाषण झळकले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळण्यापूर्वी दिल्लीत निघालेला मोर्चात भाई उद्धवराव हिरो ठरले होते.

या ऐतिहासिक संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाई उद्धवरावदादांनी जीवाचे रान केले. अपार कष्ट उपसले. त्यामुळेच शेवटी मुंबईसह महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्राला मिळाला. तो दिल्लीहून ज्यांनी आणला त्यांना जेवढे महत्त्व आहे, त्यापेक्षाही हा मंगलकलश महाराष्ट्राला द्यायला ज्यांनी केंद्राला भाग पाडले, त्यांचे महत्त्व कोण नाकारील?

**संदर्भ ग्रंथः –**


1. इंगळे, व. न., महाराष्ट्राचे शिल्पकार भाई उध्दवराव पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2003.
2. प्रधान, ग. प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस. एम. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2001.
3. पाटील, वि. वि., महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2001.
4. गंधे, शिरीष, महाराष्ट्राचे शिल्पकार शाहीर राम जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2004.
5. दिवाण, विजय, महाराष्ट्राचे शिल्पकार गोविंदभाई श्रॉफ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2004.
6. निकम, एस. आर., थोरवत श्रीहरी, (संपा.) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील लोककला आणि इतिहास, सनय प्रकाशन, आनंदवाडी, नारायणगाव, पुणे, 2020.
7. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास, खंड 5 वा, के सागर पब्लिकेशन, पुणे, 2017.
8. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र 1948–1960, खंड 6 वा, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई, 2007.
9. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्र समितीचा उदस आणि अस्तः 1956–1963, खंड 8 वा, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई, 2007.